# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१६१** **दिनांक - २७/०४/२०२४**

## मिरा भाईंदर, वसई विरार आयुक्तालयातील विरार भागातील सराईत गुन्हेगार प्रथमच एम.पी.डी.ए. कायद्या अंतर्गत स्थानबध्द.

मिरा भाईदर वसई विरार आयुक्तालयातील विरार परिसरातील सराईत गुन्हेगार मस्तान उस्मान शेख, रा. अरशीफा मंजिल, गोपचरपाडा, विरार पुर्व ता. वसई, जि. पालघर हा विरार पोलीस ठाणे हद्दीत व लगतच्या परिसरात त्याचे गुन्हेगारी व धोकादायक कृत्यांनी दहशत निर्माण करुन परिसरात वर्चस्व निर्माण केले होते. त्या आधारे परिसरातून तो बांधकाम व्यावसायिक व इतर छोटे मोठ व्यापाऱ्यांकडून पैस उकळत होता. तसेच त्याचे इतर साथीदारांसह परिसरात दहशत बसविण्यासाठी मारामाऱ्या करणे, महिलांचा विनयभंग करणे, सरकारी नोकरावर हल्ला करुन दुखापत करणे, ॲसीड हल्ला करुन जबर दुखापत करणे तसेच बेकायदेशीरीत्या शस्त्रे जवळ बाळगून लोकांना धमकावणे, खूनाचा प्रयत्न करणे इत्यादी गंभीर स्वरुपाचे अपराध केले असून त्याचेविरुध्द एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत.

त्याच्या वरील कृत्यांना आळा घालण्याकरीता प्रभारी अधिकारी, विरार पोलीस ठाणे यांनी सदर गुन्हेगाराचा पुर्व इतिहास व सर्व माहिती संकलीत करुन एम.पी.डी.ए. कायदया अंतर्गत स्थानबध्द करण्याचा प्रस्ताव पोलीस उप आयुक्त, विरार यांच्या मार्फतीने सादर केला. सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन नमुद इसम हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री पटल्याने त्यांचेविरोधात मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी एम.पी.डी.ए. कायदया अंतर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारित केले आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये प्रथमच अशा प्रकारची स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे. यापुढे देखील आयुक्तालयामध्ये अशाप्रकारे सराईत गुन्हे करणाऱ्या इसमांविरुध्द कडक कारवाई केली जाणार आहे.

------------------------------